पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा. शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

**सभावृत्तांत**

**दिनांक - ०५/१०/२०२१** **वेळ - दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार** दिनांक.**०५/१०/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावर मा.सभापती, शहर सुधारणा समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जुन २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य दालनात उपस्थित होते तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने सहभागी झाले होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.सोनवणे शारदा हिरेन
३. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
४. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आण्णा बोदडे - सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१६ दिनांक ०२/०३/२०२१ चा ठराव रद्द करणेबाबत. - मा.सुनिता तापकीर, मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२५, दिनांक ०६/०७/२०२१ मध्ये दुरुस्ती करणेबाबत. - मा.अनुराधा गोरखे, मा.सुनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.प्रा.सोनाली गव्हाणे                                        अनुमोदक - मा.शारदा सोनवणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची मंगळवार दिनांक ०५/१०/२०२१ ची पाक्षिक सभा (कार्यपत्रिका क्र.१९) ही शुक्रवार दिनांक ०८/१०/२०२१ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** शुक्रवार दिनांक **०८/१०/२०२१** रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(**प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा. शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

(दिनांक **०५/१०/२०२१** ची तहकुब सभा)

**सभावृतांत**

**दिनांक - ०८/१०/२०२१** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक ०५/१०/२०२१ ची **तहकुब** सभा **शुक्रवार** दिनांक **०८/१०/२०२१** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावर मा.सभापती, शहर सुधारणा समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जुन २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य दालनात उपस्थित होते तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने सहभागी झाले होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.साधना अंकुश मळेकर
३. मा.अनुराधा गणपत गोरखे
४. मा.सुनिता हेमंत तापकीर
५. मा.सोनवणे शारदा हिरेन
६. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
७. मा.अँड भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आण्णा बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.सुहास बहाद्दरपुरे - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

मा.शहर सुधारणा समिती सभा **(कार्यपत्रिका क्र.१८)** दिनांक.२८/०९/२०२१ चा सभावृतांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------

ठराव क्र. - ३१ विषय क्र. - ०१
दिनांक - ०८/१०/२०२१ विभाग - नगर रचना व विकास
सुचक - मा.अनुराधा गोरखे अनुमोदक - शारदा सोनवणे
संदर्भ - मा.आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/२६७/२०२१, दिनांक २८/०९/२०२१

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५|१०५०|प्र.क्र.७९५|०५|नवि-१३, दि. ३०|०५|२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना

क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस-१८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहू रोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी. चे दोन सर्व्हीस रस्त्याने प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहू रोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी.चे दोन सर्व्हीस रस्त्याचा विकास करणे सदर भागातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतूकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधीत जागा टि.डी.आर./एफ.एस.आय.चे बदल्यात मनपाचे ताब्यात देणेस जागा मालक तयार नाहीत. त्यामुळे सदर रस्त्याच्या जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील मधील स.नं. ८, ९, १०, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ७८ या पैकी मधील मंजूर विकास योजनेतील रावेत हद्द ते देहू रोड कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत मुंबई – पुणे बाह्यवळण महामार्गा लगतचे १२.०० मी.चे दोन सर्व्हीस रस्त्या खालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्र. - ३२ विषय क्र. - ०२

दिनांक - ०८/१०/२०२१

सुचक - मा.सुनिता तापकीर अनुमोदक - अनुराधा गोरखे

संदर्भ - मा.सुनिता तापकीर, मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२ दि-०८/०६/२०२० अन्वये मा.शहर सुधारणा समिती यांच्या शिफारसी नुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.७१६५ दि.१७/०६/२०२० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर ठराव मधील खालील प्रमाणे मजकुर दुरुस्ती करण्यास मा.स्थायी समितीकडे शिफारस करणे आवश्यक आहे. "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण योजना ही मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) एन.सी.आय.टी.(इंडिया) आकुर्डी पुणे-१९ यांचेमार्फत सन ३१/०३/२०२१ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणी कामीच्या धोरणास व सदर प्रशिक्षण देणेस येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे". हा मजकुर वगळुन या मजकुरा ऐवजी- "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण योजना ही मे. नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) एन.सी.आय.टी.(इंडिया) आकुर्डी पुणे-१९ ही संस्था मा.महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन इमारत, पहिला मजला, २५ फोर्ट, मुंबई - १ यांची १५ व्या वित्त आयोगांतर्गत तरतुद केलेल्या निधीतुन ग्रामीण भागातील मुली व महिलांना कौशल्यवृद्धीसाठी प्रशिक्षण देणे कामी सन २०२०-२०२१ ते सन २०२४-२०२५ मान्यता प्राप्त संस्था आहे. तरी मे. नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया)

एन.सी.आय.टी.(इंडिया) यांचेमार्फत सन २०२१-२०२२ साठी ह्या आर्थिक वर्षातील दि.३१/०३/२०२२ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणी कामीच्या धोरणास व सदर प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा". असा मजकुर नमुद करण्यास आणि मा.शहर सुधारणा समिती कडील ठराव क्र.१६ दिनांक ०२/०३/२०२१ चा ठराव रद्द करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्र. - ३३ विषय क्र. - ०३
दिनांक - ०८/१०/२०२१
सुचक - मा.सुनिता तापकीर अनुमोदक - अनुराधा गोरखे
संदर्भ - मा.अनुराधा गोरखे, मा.सुनिता तापकीर, यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व घोषित अघोषित झोपडपट्टीमधील सर्व कुटुंबांना आरोग्य उत्तम राहणेकरिता स्वच्छता किट पुरविणे बाबत महानगरपालिकेतील पालक शहरसुधारणा समितीने ठराव क्र.१७ दिनांक ०२/०३/२०२१ नुसार मान्यता देण्यात आली होती. सदर ठरावास मा.स्थायी समितीने ठराव क्र.९०२२ दिनांक १७/०३/२०२१ व ठराव क्र.९५०२ दिनांक १९/०५/२०२१ नुसार मान्यता देण्यात आली व त्यास अनुसरुन शहर सुधारणा समितीने ठराव क्र.२५ दिनांक ६/०७/२०२१ रोजी सदरची खरेदी करणेसाठी संस्थेचे नाव व लेखाशिर्ष पुढील प्रमाणे NATIONAL CO-OPERATIVE FEDRATION OF INDIA LTD. (Pune Branch) व सदर योजना पुर्ण करणेसाठी झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागातील "**झोपडपट्टी वासियांकरिता स्वच्छता किट वाटप"** या लेखाशिर्षावर वेळोवेळी उपलब्ध करण्यास अथवा सन २०२०-२१ चे अंदाज पत्रकामध्ये सुधारित बजेट मध्ये विभागाने मागणी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरच्या साहित्याचा लाभ सर्व झोपडपट्टीमधिल सर्व कुटुंबाना मिळावा तसेच कोणतेही कुटुंब या लाभापासून वंचित राहू नये या करिता प्रशासनाने सर्व झोपडपट्टीमधिल सर्व कुटुंबाची गणना व शहनिशा करावी त्यानुसार होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर बाबतीतली कार्यवाही झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील प्रशासकिय विभागामार्फत विभागप्रमुखांनी मान्य ठरावानुसार मान्यतेकामी मा आयुक्तांकडे त्वरित प्रस्तावित करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४७६/२०२१
दिनांक : ०८/१०/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.